# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/कालमर्यादित**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ १९५३

दिनांक :- 20 JUN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय पदविका/ पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय : - शासकीय तंत्रनिकेतने/महाविद्यालयांमधील बांधकामांचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.**

संदर्भ : - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.९/डीटीई/२०१९/१६० दि.११/०६/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०१८-१९ मधील शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये/महाविद्यालयांमध्ये पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीपथावर असलेल्या बांधकामांसाठी शासनाकडून संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागास निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदरहू निधी सन २०१८-१९ मध्ये संस्थांच्या बांधकामासाठी खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घेऊन GFR-12-C या नमुन्यात शासनास सादर करण्याबाबत संचालनालयाने सुचित केलेले आहे.

सा.बां. विभागाकडून सादर करावयाचे उपयोगिता प्रमाणपत्र सा.बां. विभागास सन २०१८-१९ मधील प्राप्त निधी व खर्च केलेल्या निधीचेच असावे. तसेच काही रक्कम समर्पित केली असल्यास तसे सा.बां. विभागाकडून पत्र घेऊन उपयोगिता प्रमाणपत्रासोबत जोडावे.

तेंव्हा या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या संस्थेच्या प्राचार्यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१८-१९ मध्ये बांधकामांसाठी खर्च केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व बांधकामांचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावा. सदर उपयोगिता प्रमाणपत्र व बांधकामांचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय सन २०१९-२० मधील बांधकामांसाठी मंजूर झालेला निधी वितरीत केला जाणार नाही, असे शासनाने निर्देशित केलेले आहे. याबाबतच्या दिरंगाईसाठी संस्थां प्रमुख जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी. करिता उपरोक्त शासकीय संस्थानी उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ या कार्यालयास सादर करावीत.

सोबतः संदर्भिय पत्र

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.